# मिरा भाईंदर महानगरपालिका

कार्यालय:- डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे-४०११०१ दुरध्वनी क्र. ०२२-२८१९२८२८/२८९३०२८
ई-मेल: publichealth@mbmc.gov.in
सार्वजनिक आरोग्य विभाग

जा.क्र.मनपा/सार्व.आ/ ४०९ /२०२४-२५ दिनांक:- ५/०६/२०२४.

प्रति,
जनसंपर्क अधिकारी,
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय : प्रसेनोट प्रसिध्द करण्याबाबत.**

उपरोक्त विषयान्वये दि.०६/०६/२०२४ ते दि.२१/०६/२०२४ रोजी पर्यंत शासन आदेशान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विशेष अतिसार नियंत्रण पंधरवडा राबविण्यात येणार आहे. तरी सदर सोबत जोडलेली पंधरवडाची प्रेसनोट प्रसिध्द करण्यात यावी.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी
for मिरा भाईंदर महानगरपालिका

# प्रेसनोट

## अतिसार नियंत्रण पंधरवडा( Intesified Diarrahoea Fortnght)

अतिसारामुळे होणारे बालमृत्यु कमी करुन ते शुन्यावर आणणे हे उद्दिष्ट ठेवून दि.०६/०६/२०२४ ते दि.२१/०६/२०२४ या कालावधीत शासन आदेशान्वये मिरा भाईदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विशेष अतिसार नियंत्रण पंधरवडा राबविण्यात येणार आहे. या पंधरवडामध्ये जनजागृती, अतिसारामध्ये घ्यावयाची काळजी, ओआरएस व झिंक गोळया यांचा वापर कसा करावयाचा याची प्रात्याक्षिके, ओआरएस व झिंक गोळयांचे घरोघरी वाटप, आरोग्य संस्थांमध्ये ओआरएस व झिंक कोपरा स्थापन करणे व अतिसार झालेल्या कुपोषित बालकांवर उपचार या सर्व बाबींचा समावेश आहे.

सदर पंधरवडा आरोग्य केंद्राअंतर्गत संपूर्ण कार्यक्षेत्रात प्राधान्याने अस्वच्छ ठिकाणावरील लोकवस्ती, शहरी झोपडपट्टी अतिदुर्गम भाग, डोगरांळ भाग, अदिवासी क्षेत्र, पुरग्रस्त भाग, भटक्या लोकांची वस्ती, वीटभट्टी, बांधकाम सुरु असलेले क्षेत्र, अनाथ बालके, तात्पुरत्या स्वरूपातील वस्ती , रस्त्यावर राहणारी बालके, मागील २ वर्षात अतिसाराची साथ लागलेले क्षेत्र, पाणीपुरवठा व स्वच्छतेचा अभाव असलेले क्षेत्र, छोटी गावे, पाडा, तांडा, वस्ती झोपडया इ. या सर्व जोखीम ग्रस्त भागाचा समावेश करण्यात येणार आहे.

सदर पंधरवडामध्ये आरोग्य केंद्रामध्ये कार्यरत सर्व आशा आपल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक घरांना भेटी देणार असून सदर भेटी दरम्यान ५ वर्षाखालील अतिसार असलेल्या बालकांना २ ओ.आर.एस. पाकिटे व १४ झिंक गोळयांचे वाटप करण्यात येणार आहे. तसेच आरोग्य केंद्र, उपकेंद्र, आरोग्य वर्धिनी केंद्र, अंगणवाडी केंद्र, रुग्णालय या ठिकाणी ओ.आर.एस. व झिंक कॉर्नर स्थापन करुन सदर पंधरवडा राबविण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने महानगरपालिका स्तरावर सुकाणू समितीची स्थापन करण्यात आली असून मा.अति.आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली सदर समिती सभा दि.०५/०६/२०२४ रोजी आयोजित करुन वैद्यकीय अधिकारी यांना कार्यक्षेत्रात नागरिकांना जनजागृती करण्यास व कार्यक्षेत्रातील ५ वर्षाखालील बालके वंचित राहणार नाही . त्याप्रमाणे कार्यक्षेत्रात सर्वेक्षण करुन सदरची अतिसार नियंत्रण पंधरवडा यशस्वीरित्या राबविण्यास सुचित करण्यात आले.